
श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## .मासिक.

वर्ष १७ ] शके १८६२ आषाढ. [ अंक ४

बाबा बाबा निशिदिनि मना बोल रे बोल बाबा ॥
बाबा नामीं, कितितरि असे दिव्य जादू अबाबा ॥



बा बालिश्यं, त्यज शरण जा त्या न भूपा नबाबा ॥
बा बाधा ना, तुज यमगृहीं जावयाची जबाबा ॥

नलनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥ १ ॥

—शंकराचार्य

संपादकः—रामचंद्र वासुदेव धैसास

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| श्रीसाईलीला व तिचे कार्य .... ... ... ... | १८५-१८ |
| श्रीसाईनाथ महाराजांची आरती ... ... ... | १८८ |
| पदे ( श्री दासगणूंचीं ) ... .... ... ... | १८९-१९ |
| कै. धुमाळ ... .... ... ... ... | १९१ |
| श्रीरामनवमी उत्सव, शिर्डी ... ... .... .... | १९२-१९ |
| भक्तांस सूचना ... ... .... ... ... | १९४ |
| श्री दासगणूंचे ट्रस्टींना पत्र ... .... ... ... | १९५-१९ |
| जमाखर्चाचा तपशील ... ... ... ... | १९७ |
| श्री सद्‌गुरु साईनाथ सेवा संस्थेचा रामनवमी उत्सव .... ... | १९८ते२ |
| शिर्डीवृत्त ... ... ... .... ... ... | २०१ |
| फकिराचे वेषांत बाबांचे दर्शन .... ... ... ... | ३५ |
| आजारपणांत बाबांची कृपा ... ... ... ... | ३६ |
| श्री साईनाथ महाराजांची आख्यायिका ... ... .... | ३७ ते ४ |


## श्रीसाईभक्तांस विनंती

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोष्टांतून पाठविले उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोहचतां परत येतात. तरी कृपा करून त्यां आपले पत्ते फेरबदल झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ रोड, ठाणें यांस कळवावें.

भक्तांनी आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून खा पत्त्यावर पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनी आपलें टो नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनीं चालू सालची म्हणजे शके १८६२ ची वर्गणी ३ रु. ६ आणे अ पाठविली नाहीं, त्यांनीं कृपाकरून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठऊन अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें, म्हणजे ३ रु. ९ आ. ची व्ही. पी. करणेंत येई


**रा. वा. धैसास, संपादक.**

लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नंबर २
गोखले रोड नॉर्थ, दादर मुंबई १४.

श्री साईबाबा



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः॥

शके १८६२ ) श्रीसद्गुरु साईनाथ ( वर्ष १७ अंक ४

# श्रीसाईलीला व तिचें कार्य.

संपादक " श्रीसाईलीला मासिक " यांस—

साष्टांग नमस्कार वि. वि. श्रीसाई महाराजांचे कृपेनें क्षेम आहे. आपल्या मासिका बद्दल चार सूचना करणें जरूर वाटत आहे. त्यांचा योग्य विचार व्हावा.

हल्लीं मासिक सर्व साधारणपणें चांगलें चाललें आहे. त्याबद्दल आपण अभिनंदनास पात्र आहांत. मासिकाची उपयुक्तता भक्तजनांस व साधकांस जास्त व्हावी या दृष्टीनें माझें असें मत आहे कीं, अशा लोकांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अनुभव व तद्विषयक लेख व चर्चा यांस जास्त अवकाश मिळावा. पुष्कळ वेळां गुरुजनांचे अनुभव सूक्ष्म स्वरूपांत दिसून येतात. भक्तांचा व त्यांचा संबंध विलक्षण रीतीनें येऊन भक्तांचें आयुष्यांत—विशेषतः त्यांचे विचारसरणींत व ध्येयांत एकदम बदल होत जातो. पूर्वींचे विचार व कल्पना नाहींशा होऊन नव्या सृष्टींत—अर्थात्, मानासिक—तो वावरूं लागतो. अशा वेळीं गुरु-

जनांकडून [ Master ]* झालेली प्रेरणा, त्यांच्याकडून मिळालेली मदत इत्यादि गोष्टींची चर्चा आपले मासिकांत यावी. फार झाल्यास लेखकानें आपलें नांव वाचका पासून गुप्त ठेवावें. लौकिक गोष्टींत गुरुंची अचानक मदत झाल्यानें संतोष होतो. त्याच प्रमाणें गुरूंच्या आश्रयाखाली गेल्यासारखें होऊन आपल्या आयुष्यांत विलक्षण क्रांति होते व जीविताचा सुकाणूच बदलून त्यास योग्य म्हणजे आध्यात्मिक दिशा लागते. असे विवेचनात्मक लेख मासिकांत यावेत. त्याचा उपयोग इतरांस फार होईल. रुक्ष तत्व-ज्ञानाचे लेख नकोत तथापि अनुभवजन्य [.mystic] विषय ज्यास्त यावेत. म्हणजे मासिकाचा दर्जा वाढेल. इंग्रजी शिक्षणांनीं भूषित अगर दूषित झालेल्या आधुनिकांच्या बुद्धीस योग्य वळण लागेल व श्रद्धा बळावत जाईल. इंग्रजींत अशी कांहीं मासिकें आहेत तीं पहावींत.

इंग्रजी मासिक नवीन स्वतंत्र निघाल्याचें समजलें. त्यांत इंग्रजी—तेलगू तामीळ भाषांत येणाऱ्या अनुभव विषयक लेखाचे—सर्व लेखांचें भाषांतर आपल्या मासिकांत यावे.

श्रीसाई संस्थानाचा व शिर्डी येथें घडणाऱ्या गोष्टींचा अहवाल त्रोटक द्यावा. जमा-खर्चाची यादी व मदतीची यादी संपूर्णपणें देणेचें झाल्यास पुरवणी म्हणून देण्यांत यावी. हल्ली त्यांतच फार पृष्ठें खर्च होतात. श्रींचे चरणीं मदत करूं इच्छिणारे आपले नांव प्रसिद्ध व्हावें म्हणून मदत करीत नसतात. तथापि संस्थानाचा हिशेब चोख असावा व सर्वांना विदित व्हावा असें आपणांस वाटत असल्यास स्वतंत्रपणें अगर पुरवणी रूपानें छापावे

वरील सूचना अमलांत आल्यास मासिकाची उपयुक्तता वाढेल.

कळावें ही विनंति.

श्रींचा दासानुदास.

वरील एका मुंबई विश्वविद्यालयाचे एम. ए. पदवीधर व फेलो असलेल्या साई भक्तांकडून लीला संपादकांस आलेले पत्रांत नमूद केलेल्या सूचना उद्बोधक व मननीय आहेत म्हणून साई भक्तांचे माहितीकरितां तें पत्र संपूर्ण छापणेंत आलें आहे.

सूचना नं. १ प्रमाणें साईभक्त अनुभव व तद्विषयक लेख पाठवून लीला कार्यास मदत करतील अशी उमेद आहे.

सूचना नं २ प्रमाणें इंग्रजी मासिकांतून प्रसिद्ध होणारे अनुभवांचे वगैरे अनुवाद लीलेंत प्रसिद्ध करणेचे धोरण ठरलेले आहेच.

सूचना नं. ३ या दृष्टीनें इतःपर धोरण ठेवणेंत येईल व तें सोई भक्तांस पसंत पडेल अशी उमेद आहे.

सूचना नं. ४ हा प्रश्न थोडा अनिश्चित आहे. शेंकडों रुपयांची मदत करणारे भक्त " बाबा अर्पण " या मनोभावानें संतुष्ट असल्याचें दिसून येतें तर पै पैका देणारे पोष्टाच्या पावत्या व त्यावर संस्थानच्या पावत्या मिळोनहि उत्सव वसुलींत चुकून नांव निर्देश नसल्यास तक्रारी करितात व नजर चुकीनें व मागाहून वसूल आल्यामुळें नांवें छापणेचें राहून गेलें आहे व तुम्हांस पोष्टाच्या व संस्थानच्या पावत्या मिळालेल्या आहेतच म्हणून कळविले तरी त्यांचे समाधान होत नाहीं.

या बाबतींत बाबांचे कार्यास दिलेला पैसा बाबाकडे रुजू होतो हें उदात्त ध्येय व त्यांस संस्थान पावत्याची व्यवहारिक जोड असूनहि भक्तांचा भक्तांनींच निवडून दिलेले त्यांचेपैकीं भक्तकार्य वाहकांबद्दल इतका अविश्वास कां असावा हें एक बाबाच जाणोत. शिवाय संस्थानचे हिशेब पूर्णपणें हिशेब तपासनिसांकडून तपासले जातात व दोन मंडळांपुढें मांडलें जातातच. तेव्हां अशा परिस्थितींत उत्सव हिशेबांचें जमाखर्चानें मासिकाची पृष्ठें भरून काढणें खरोखरच अव्यवहार्य आहे.

वरील बाब भ. मंडळांपुढें विचारास ठेवणेचें ठरविलें आहे.

लीलेचे एके काळीं १०००।११०० वर्गणीदार होते. हल्लीं १२५ वर्गणीदरांवर लीला संस्थानला चालवावी लागत आहे. लीला चालू राहावी या विषयीं दुमत नाहीं. नवीन धोरण स्वीकारून लीलेचें पुनर्जीवन करणेचें चालू प्रयत्नांस यश देणें केवळ भक्तमंडळाचे सहानुभूतिवर आहे. तसें झाल्यास मासिक वेळचें वेळीं निघण्यास सुलभ होईल तरी आज जे भ. मंडळाचे म्हणूच सभासद आहेत त्या प्रत्येकांनीं लीलेस आश्रय देणेचे मनांत योजल्यास लीलेची वर्गणी त्यांचेकरितां कमी धरून आजमासें रु. २ वर्गणी व भ. मं. दरसालची रु. ५ ची वर्गणी मिळोन दरसाल रु. ७ भरणेचा या मंडळानीं संकल्प केल्यास तशी योजना आमलांत आणून लीलाकार्य सुलभ केल्याचें त्यांस श्रेय मिळेल. ही सेवाहि बाबाचेकडे रुजू होईल हें सांगणें नलगे.

ठाणें,
ता. ४।७।४०

श्री. ना. खारकर.
ऑ. नि.

# श्रीसाईनाथ महाराजांची आरती.

( लेखकः—कृ. वा. दे. )

( चाल आरती भुवनसुंदराची )

आरती साईराज यांची । जयश्री दत्तात्रय गुरुची. ॥
त्रिभुवनीं सग्दुरु तूं साचा । निर्मल निर्गुण ज्ञानाचा ॥
अनादि पुरुष प्रभू मनुचा । अससी अंकुर तूं त्याचा ॥
नमुनी तुजसि आदि देवा । ना धरि मानसिं जन परवा ॥
ध्यानीं धरितों तुज बरवा । जय करुणाधन, सौख्या कारण, ॥
नित्य निरंजन, आवड भक्तीची । दयाळा तुझिये स्वरूपाची ॥ आ० ॥ १ ॥

आत्म-ज्ञानावांचोनी । सार न दुसरें तव वचनीं ॥
भवभयें येतिल जे थकुनीं, । तयांसीं लाविसी तूं भजनीं ॥
अगा ये पुण्य पुरुषस्वामी । स्फुरसी निजानंद ब्रह्मीं ।
कृपा कर वेदमूर्ति तुम्ही । सच्चिदवृत्ता, जयश्रीदत्ता, हे सत्पात्रा ।
बोधुनि यांची, हरिसी पिडा संसृतीची ॥ आ० ॥ २ ॥
शुकादिक ब्रह्म जिवनमुक्त । असें जें वेदश्रुति वदत ॥
तयांसम हृदयिं न आसक्त । वांच्छिसि मुक्तांहुनि भक्त ॥
भजसि नित्य निराकारा । देउनि निरवधि आधारा ।
दाविशि सद्‌गुरु माहेरा । जयश्री मुनिवर, पूर्ण कृपा कर, जय जोगेश्वर, मूर्ति सद्‌गुरुचि, श्रपिति नरहरि देवाची ॥ आ० ॥ ३ ॥

सद्‌गुरुध्यान समाधान । वदन हें प्रसादाचें सदन ॥
पद्मसम योग्य तुझे चरण । माथां घेइं दास कृष्ण ॥
भो भो भवन्गुरु सदया । जनार्दनस्वामि साईराया ।
मागत अक्षय तुज अभया । गुणगणमंडित, कीर्ति अखंडित, जयश्री अवधूत, राखि लाज त्यांची, दयाकर निजप्रिय भक्तांची ॥ आ० ॥ ४ ॥

श्री साईलीला संपादक यांस

सप्रेम कृ. सा. न. वि. वि.

दास गणू महाराजांनीं रचिलेले चांगदेव आख्यान गेले रामनवमीचें वेळीं शिरडीत लाविलें होतें. कीर्तन आटोपतांच त्यांतलि पुंढील पदें बाल गोपालांचें सारखी तोंडी ऐकिवांत आलेवरून ती साईलीलेंत प्रसिद्ध करून त्यांतील आस्वाद बाबांचे प्रेमी बालगोपालवृंदांस द्यावा अशी भावना होऊन त्याप्रमाणें दास गणू महाराजांकडून ती मागऊन श्री साईलीलेंत प्रसिद्धीस पाठविली आहेत. तरी ती जरूर प्रसिद्ध करावी.

ठाणें, ता. १–६–४०                    श्री. ना. खारकर
ऑ. चि.

## पद १ (चाल, रमला कुठें)

सांगा कुठे हो गेला ॥ मंदिरचा बन्सिवाला
अथवा तया न्यायासी ॥ आला आना गोंदिसी
तो भूपती सग्दुणराशी ॥ श्री राम राजा बोला ॥ १ ॥

वा संत सखूचे साठीं ॥ गेला कां कृष्णा काठीं
श्री विठ्ठल हा जगजेठी ॥ नेपून या लुगड्याला ॥२॥

भणभणीत हे मंदीर ॥ ना विटेस शारंगधर
जो जगत्रया आधार ॥ बेपत्ता कैसा झाला ॥ ३ ॥

## पद २ ( चाल, सदर )

गेला कुठे हो माझा ॥ पंढरीचा विठ्ठलराजा
जो पुंडलिके जगजेठी ॥ आणिला भिमेच्या काठीं
या परम पुनित महाराष्ट्रीं ॥ श्री रुक्मिणी ज्यांची भाजा ॥ १ ॥

आतां आम्हा दुबळ्यांची ॥ आहे कींव कुणा यायाची
धरितांच पाऊले ज्याची ॥ धावला दिनाच्या काजा॥२॥

## पद ३ (चाल, जरा हलु)

कसा लपुन बससी ये ठाईं ॥ ध्रु०॥
बरे दिसेल असे कर कांहीं ॥
(चाल) मत्त कपटी भस्मासुर ठेवाया शिव शिरीं कर
आला तै खचुनी धीर लपत फिरे परमेश्वर
तसें तुझें झाले कीं आज पाही ॥ १ ॥

हिंदू यवन तूंच एक, नाहीं कुठें मुळींच फरक
नंदनवन जग सुरेख, उभयांचे
असुन देख
उणे दुणे करसी कां ठाईं ॥ २ ॥

## पद ४ (चाल, यमुनाजळीं)

मज देवूनिया ती भाक मुकुंदा कां
विसरतां
असतां कृपेचा साठा
पडला तया कां तोटा
प्रभु तोटा
सख्या सांग कीं आतां
समयीं ऐशा पंढरीषा
पुरवी आशा श्री रमेशा
उठवाना
झणी वेग मही वेळ उगा
आतां लावितां

# कै. सखाराम बळवन्त धुमाळ



मृत्यू—शनिवार ता. २९ जून १९४०

**श्री साईनाथ** ठाणें, ता. ४।७।४०

श्री. संपादक "श्री साईलीला मासिक" यांस कृ. सा. न. वि. वि.

कळविणेस अत्यंत खेद वाटतो कीं श्री. साईबाबांचे एक निस्सीम भक्त व शिरडी संस्थानचे एक विश्वस्त, रा. बा. सखाराम बळवंत धुमाळ, वकील नाशिक हे शनिवार ता. २९ जून रोजीं रात्रौ ९॥ वाजतां हृदय क्रियेचें विकारानें अकास्मिक साईपदीं विलीन झाले. ही वार्ता ऐकुन सर्व भक्त मंडळांत दुःखोद्‌गार निघतीलच. परंतु जन्मास आलेल्या प्रत्येक प्राण्यास मरण हे ठरलेलेंच आहे या सृष्टी नियमाकडे लक्ष देऊन आलेलें प्रसंगांस तोंड देणेंस तयार होऊन सर्व साईभक्त भाऊ साहेबांचे कुटुंबीयांस त्यांचें दुःखद प्रसंगाचें वाटेकरी असलेचे कळवुन त्यांचें शांतवन करतीलच.

भाऊसाहेबांचा बाबांचे ठिकाणीं निस्सीम भक्तीभाव व पूर्ण विश्वास जागृत होता. बाबांनीं त्यांना समक्ष आश्वासन दिले होतें कीं " तुला फुलासारखा ठेवीन व फुलासारखा नेईन" याची जाणीव ३।४ वर्षावर तें मुंबईतील श्री वागदेव यांचे दर्शनास गेलेंवेळीं बाबानीं वागदेवांचे मुखांतून फक्त तेवढेंच उद्गार काढुन त्यांस पुन्हां करून दिली होती म्हणून तें सांगत असत. अलीकडे आपणांस शिरडींत मरण यावें अशी त्यांचें मनास तळमळ असे. सवड मिळतांच शिरडीस वेळोंवेळीं तें जात असत. भक्तांच्या इच्छा कांहींही असोत परंतु त्यांचें बरे वाईट सद्‌गुरूच जाणतात व त्याचप्रमाणें बाबानीं भाऊ साहेबांचें निधन शिरडींत न होऊं देतां त्यांचें वास्तु खालींच घडऊन आणिले. असो. बाबा त्यांचे आत्म्यास पूर्ण शांति देवोत अशी नम्र विनंति श्री, चरणी सर्व साईभक्तांची असो. कळावे हे विनंति.

आपला नम्र

श्री. ना. खारकर

ऑ. चिटणिस

# श्रीरामनवमी उत्सव शिर्डी

श्री सच्चिदानंद सद्‌गुरु आधुनिक संत चूडामणी श्री साईबाबा महाराज संस्थान शिर्डी, ता. कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांच्या शके १८६२ चैत्र शु.॥ ९ च्या रामनवमीच्या उत्सवाचा अहवाल.

उत्सवास आरंभ चैत्र शु०॥ ८ ता. १५।४।४० रोजीं होऊन चैत्र शु०॥ १२ ता. १९।४।४० रोजी काला होऊन उत्सवाची समाप्ती झाली.

उत्सवास नान्देड, उमरी, गोरटे, जांबगाव, मुखेड, मांजरम, कोलंबी, गव्हण, आतनूर, पेठशिवणी, कन्नड, मुंबई, अंधेरी, विलेपार्ले, सांताक्रूज, वांद्रा, ठाणे, कल्याण, पुणें, फत्तेखेडें, खामगांव, जळगांवजामाद, शेगांव, यावल, खानदेश, धुळें, मालेगांव येवलें, नाशिक, पंढरपुर, बार्शी, सोलापूर, पांथ्री, माळशिरस, अहमदनगर, मातुलठाण, पैठण, शेवगांव, पुणतांबे वगैरे ठिकाणाहून लोक आले होते. उत्सवाचे कार्यक्रम सर्व निर्विघ्नपणें पार पडले. अष्टमीचे दिवशीं वरणभात, पांढरी पोळीचें पान सुमारें तीनचारशें झालें. रामनवमीचे दिवशीं जिलबीचें प्रयोजन झालें. त्याचें पान सुमारे पावणेदोनहजार झालें. दशमीचे दिवशीं गुळशिऱ्याचें पक्वान्न केलें त्याचें सताटशें पान झालें. एकादशीचें दिवशीं उपासाचें व जेवणाचें मिळून तीनचारशें पान झालें. व द्वादशीच्या दिवशी बुंदिच्या लाडवाचें प्रयोजन झालें. या दिवशीं हजारबाराशें पान झालें. असा अंदाज आहे. पांच दिवसांत मिळून ४५५० पान झालें.

या उत्सवास बाहेरगांवाहून उत्सवाप्रित्यर्थ तिघाकडे वर्गणी आली. ती श्री दासगणू महाराज, श्रीधर नारायण खारकर, रामभाऊ सामंत खजिनदार या तिघाकडे आली. त्याची तपशलिवार यादी व जमाखार्चाचा खर्डा पोटीं आहे.

या उत्सवाचा कोठीचा बंदोबस्त व सामान खरेदी गोविंद वामन कष्टांकवार मुखेड यानीं ठेवला होता व त्यास मारुती पत्तेवार, बाबा रामचंद्र पत्तेवार, किसन गंगाराम, भीम रघुनाथ पानशिवडीकर वकील यानीं मदत केली.

ह्या उत्सवास पंक्ति वाढण्याचा बंदोबस्त भगवानराव मांजरमकर, दिगंबर धोंडोपंत नान्देडकर, दत्ता जगन्नाथराव मास्तर, दत्ता कलमनुसेकर, शांताराम, जोशी, तुकाराम केशव आजेगांवकर, जोगळेकर, राहातेकर गांधी, कृष्णराव साठे पुणे, बाळा

भटजी गोरटेकर, याडकीकर कोपरगांव, वगैरे मंडळींनी चांगला ठेविला होता. त्यामुळें अन्नाचीं नासधूस झाली नाहीं.

गोविंद काशिनाथ करबेळकर आचारी पुणें यांनीं स्वयंपाकाचा बंदोबस्त उत्तम केला. व पक्वान्नें चांगलीं केलीं. नासधूस होऊं दिली नाहीं.

दुगाम्याचा बंदोबस्त तात्या पाटील, रामचंद्र पाटील, वामन गोंदकर, बिठोबा पोलिस पाटील यानीं पोलिसांच्या सहाय्यानें उत्तम ठेवला होता. त्यामुळें कोणतीहि तक्रार विकोपास गेली नाहीं. तसेंच तालुका ऑफिसर, रावसाहेब मामलेदार, सबइन्स्पेक्टर पोलीस राहाता हे आले होते. त्यामुळें दंगा फिसाद, चोरी, मारामारी वगैरे कांहीं झालें नाहीं. पिण्याच्या पाण्याच्या विहिरींत पोट्याश परम्यागनेट उत्सवाचे आरंभी एक दिवस टाकण्यांत आलें होतें. त्यामुळें रोगराई वगैरे फैलावली नाहीं.

या—उत्सवास कासाराची भांड्यांचीं दुकानें, मिठाईचीं दुकानें, कापडाचीं दुकानें, व इतर किराणा व भाजीपाल्याचीं दुकानें, स्टेशनरी दुकानें वगैरें मिळून शंभर सव्वाशें दुकानें आलीं होतीं. रामनवमीचें दिवशीं गंगेच्या कावडीचा थाट गेल्यासालपेक्षां चांगला झाला. कावडी सुमारें २५०—२७५ पर्यंत आल्या होत्या. त्यांत शिर्डी, निंबगाव, निगोज, सावळ विहीर, कनकुरी, नांदुरकी, रुई, पिंपळवाडी वगैरे ठिकाणचीं संत प्रेमी मंडळी होती. कावडीचा बंदोबस्त श्रीदासगणू महाराज व मोंगलाईतील मंडळी यांनी उत्तम ठेवला होता. कावडी आणणारांत ब्राह्मण, मराठे, धनगर, माळी, लोहार, सुतार, वाणी, मुसलमान, वडारी वगैरे पुष्कळ लोक सामील झाले होते. रामनवमीचे दिवशीं संध्याकाळीं काठ्याची व रथाची मिरवणूक निघाली. त्याचा बंदोबस्त रघुवीर भास्कर पुरंदरे व गबा सुतार यानीं ठेवला होता. रात्रीं शिरडीच्या मुसलमान लोकानी श्री साई महाराजास संदल आणून चंदन चढवले व पांचसात नवे गलफही अर्पण केलें. तंटे तक्रारी कांहीं झाल्या नाहींत.

व १७ चालू साला बाहेरगांवचें कित[illegible] [illegible]ळकर, तुकाराम [illegible] व आजेगावकर, सय्यद हुसेन अब्बासअली [illegible] आलें होतें. सय्यद हुसेन अब्बास अलीनें वारकरी निरुपण व कीर्तन फार चांगलें केलें. यास ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, पासष्टी चांगली परिचयाची आहे. हा सदरचा सय्यद हुसेन श्रीसाईबाबांच्या पायापाशी सेवा करण्यासाठीं आज दोन महिन्यापासून आहे. जोगळेकर बुवा अण्णामाई यांची प्रवचनें झालीं. व विषय गुरुभक्ति व संतसेवा हा होता. तसेच बाल कीर्तनकार अनंत दामोदर आठवले या मुलानेंहि कीर्तन चांगलें केलें. उत्सवाचे [illegible] गवयी किसनराव आबाजी कासार पाथ्रीकर यांचें गायन झालें. तसेंच ताराबाई बेलापुर-

कर व इतर तमासगीर यानीं श्रीसाईबाबापुढें हजेरी दिली. रामनवमीचे दिवशीं संध्याकाळी व रात्रौ दारुकाम उत्तम व प्रेक्षणीय झालें.

नेहमींप्रमाणें चालू सालीहि उत्सवांत श्रीसाईबाबाच्या सेवेकरी मंडळीस रेशमि-काठी उपरणी वाटली गेली. गोरगरीबास व शाळेंतील पांच विद्यार्थ्यांस सदरें दिलें.

या उत्सवाच्या अहवलांत—जाणून चुकून अगर नजर चुकीनें कांहीं चुका झाल्या असल्यास त्याची श्रीसमर्थ साईबाबांनीं माफी करावी. तसेंच या उत्सवास ज्या लोकांनीं द्रव्य सहाय्य केलें, व श्रीच्या प्रसादासाठीं व सेवेसाठीं जे हजर राहीलें त्यांचें संरक्षण व मानमरातबाचें रक्षण व प्रकृतीचे स्वास्थ्य श्रीसमर्थ साईबाबांनीं ठेवावे व अशीच सालोसाल दासाच्या हातून उत्सवाची सेवा घेत जावी इतकी सविनय श्रीसमर्थ साई-बाबांच्या चरणापाशीं नम्र विनंति करून हा उत्सवाचा अहवाल लेख पुरा करतो.

सकल संताचा चरणरज

दासगणू

ता. क.:—संस्थान कमिटीचे विचाराकरितां पुरवणी पत्र जोडलें आहे तें पहा.

—:×*×:—

# भक्तांस सूचना

श्रीसाईबाबांचे शिरडी संस्थानांत कोणतेही धर्मकृत्य करणे ते संस्थान कमिटीचे चिटणीस मार्फत करावें. कारण इतरांमार्फत भक्तांची बरीच फसवणुक होत असलेचे संस्थानचे नजरेस आले आहे. यास आळा बसावा म्हणून संस्थान व्यातिरीक्त कोणासही कोणतेही ध. कृ. संस्थानांत करणेस बंदी आहे.

आभिषेकाचा चार्ज ४ आणे. आभिषेक करणारे ब्राम्हणाची दक्षणा व १। आ[illegible] ५[illegible] [illegible]वा, मिळोन अभिषेका[illegible] ५। आणेपक्षां जास्त चार्ज [illegible] कोणींही देऊ नये. बाबांचे पेटींत १।[illegible] आणा जमा होते [illegible]र्ती त्यातून भक्तांस आभिषेक कृत्य उरकलेवर त्या ध. कृ. बद्दल उदीप्रसाद पोष्टानें शिरडीहून परस्पर पाठवला जावा अशी योजना संस्थाननें ठेविली आहे.

श्री. ना. खारकर

ऑ. चिटणीस

कर व इतर तमासगीर यांनी श्रीसाईबाबापुढें हजेरी दिली. रामनवमीचे दिवशीं संध्याकाळीं व रात्रीं दारुकाम उत्तम व प्रेक्षणीय झालें.

नेहमीप्रमाणें चालू सालीहि उत्सवांत श्रीसाईबाबाच्या सेवेकरी मंडळीस रेशीमकाठी उपरणीं वाटली गेली. गोरगरीबास व शाळेंतील पांच विद्यार्थ्यांस सदरें दिलें.

या उत्सवाच्या अहवलांत—जाणून चुकून अगर नजर चुकीनें कांहीं चुका झाल्या असल्यास त्याची श्रीसमर्थ साईबाबांनीं माफी करावी. तसेंच या उत्सवास ज्या लोकांनीं द्रव्य सहाय्य केलें, व श्रींच्या प्रसादासाठीं व सेवेसाठीं जे हजर राहीलें त्यांचें संरक्षण व मानमरातबाचें रक्षण व प्रकृतीचे स्वास्थ्य श्रीसमर्थ साईबाबांनीं ठेवावे व अशीच सालोसाल दासाच्या हातून उत्सवाची सेवा घेत जावी इतकी सविनय श्रीसमर्थ साईबाबांच्या चरणापाशीं नम्र विनंति करून हा उत्सवाचा अहवाल लेख पुरा करतो.

सकल संताचा चरणरज

दासगणू

ता. क.:—संस्थान कमिटीचे विचाराकरितां पुरवणी पत्र जोडलें आहे तें पहा.

—:×*×:—

# भक्तांस सूचना

श्रीसाईबाबांचे शिरडी संस्थानांत कोणतेही धर्मकृत्य करणे ते संस्थान कमिटीचे चिटणीस मार्फत करावें. कारण इतरांमार्फत भक्तांची बरीच फसवणुक होत असलेचे संस्थानचे नजरेस आले आहे. यास आळा बसावा म्हणून संस्थान व्यातिरीक्त कोणासही कोणतेही ध. कृ. संस्थानांत करणेस बंदी आहे.

आभिषेकाचा चार्ज ४ आणे. आभिषेक करणारे ब्राम्हणाची दक्षणा व १। आणा [illegible] पदा— [illegible]वा, मिळोन अभिषेका- ५। आणेपक्षां जास्त चार्ज [illegible] कोणीही देऊ नये. बाबांचे पेटींत १। चार आणा जमा हो[illegible] [illegible]र्ती त्यातून भक्तांस आभिषेक कृत्य उरकलेवर त्या ध. कृ. बद्दल उदीप्रसाद पोष्टानें शिरडीहून परस्पर पाठवला जावा अशी योजना संस्थाननें ठेविली आहे.

श्री. ना. खारकर

ऑ. चिटणीस

## श्रीशंकर

श्री. रा. रा. शिर्डी संस्थानचे सर्व ट्रस्टी व सभासद यांस, दासगणूचा अनेक आशिर्वाद वि. वि.

माझ्या या पत्राचा आपण योग्य विचार कराल अशा समजुतीनें मी हें पत्र लिहित आहे. श्रीसद्गुरु साई महाराजांनी श्रीरामचंद्राच्या मूर्ती आज कित्येक दिवस घेऊन ठेवल्या आहेत. त्या मूर्तींशीं तात्या पाटलाचा व गांवकऱ्यांचा कांहीं संबंध नाहीं. महाराजांनी या मूर्ती घेतलेल्या आहेत. व त्याची स्थापना मशीदीपाशीं तुळशीवृंदावनाजवळ उत्तरेच्या बाजूला करावी असें ठरलेहि होतें. पण तो योग कांहीं कारणमुळें त्यावेळीं घडून आला नाहीं. आज महाराजांना जाऊन दोन तपें होत आली. तरी त्यांनीं घेतलेल्या मूर्तींची स्थापना होऊं नये ही कमिटीला कमीपणा आणणारी गोष्ट आहे. शिर्डी संस्थानची जी कमिटी स्थापन झाली ती श्रीसाई महाराजांची व्रतें चालवण्यासाठीं झाली आहे. असे असून श्रीराममूर्तींची स्थापना रेंगाळत चालावी हें बरें नाहीं. आतां कमिटीपुढें कांहीं लोक असा एक युक्तिवाद मांडतील कीं श्रीसाईबाबा हे रामाच्या मूर्ती खरेदी करणार नाहींत. कारण ते मूर्तीपूजक नव्हते. ते कोणी आणल्यास मुसल्मानी धर्माप्रमाणें फात्या देऊन तो प्रसाद वाटण्यास सांगत असत असें आहे, त्याअर्थी त्यांनीं रामाच्या मूर्ती त्यांनीं घेतल्या नसाव्यात हेंच खरें दिसतें. पण श्रीसाईमहाराजांची तऱ्हा अगदी निराळी होती. ते फात्या देत असत एवढ्यावरून मूर्ती त्यांनी घेतल्या नसाव्यात असे वाटण्यास एक जागा आहे. पण ती फोल जागा आहे. मुसल्मानी धर्माप्रमाणें मशीदीत गोसाव्या-सारखी धुनी असणें संभवनीय नाहीं. पण त्याच मशीदींत महाराजांची धुनी अहोरात्र होती. व ती आजहि कमिटीच्या लोकांनीं जागृत ठेविली आहे. श्रीसाईबाबा महाराज श्रीरामजयंतीचा उत्सव करीत असत. तो जेव्हां पूर्वस्वरूपांत होता तेव्हां फार थोड्या-नाच कळत असे. त्या उत्सवाची पद्धत अशी होती. रामनवमीचे दिवशीं श्रीसाईबाबा स्वतः मशीद धूत असत. व दुपारीं बाराचे सुमाराला थोडें तेल आणून दिवे लावीत. व पैसा अधेल्यांचा गुलाल आणून धुनीवर, आपले डोक्यावर, मशीदीचे तीन पणत्यावर, कोपऱ्यांत, कमानींत, उधळीत. पुढे त्या रामनवमीला श्रीसाईबाबा हे महासंत आहेत अशी प्रसिद्धी झाल्यावर फार महत्व आलें तें इतकें कीं, रामनवमीचे दिवशींच पंढर-पुरच्या आषाढी एकादशीप्रमाणें जत्रा जमूं लागली. त्यांचे देखत मशीदीपुढें कथा, कीर्तनें, रामजन्म होऊं लागला व जन्म झाल्यावर श्रीसाईबाबा पेढे व बर्फी पुष्कळ वाटीत. त्यांना जर हा जन्मउत्सव सम्मत नसता तर त्यांनीं ही प्रथा आपल्या देखतच

बंद केली असती. पण तसे त्यांनीं केलें नाहीं. उलट एका रामनवमीला तर मला मुद्दाम नान्देडाहून आणऊन मशीदीपुढें रामजन्माचें कीर्तन करण्यास लावलें. पुढें मी दोन चार वर्षें त्यांचे हयातींत रामनवमीची कीर्तनेंहि केली. आतां श्रीसाईबाबा हे रामभक्त होते कीं नाहीं यास दुसरा पुरावा असा आहे कीं, एकदां मेहेरबान नाम-जोशी साहेब असिस्टंट कलेक्टर यांचेपुढे त्यांचीं शिर्डीस साक्ष झाली. त्या साक्षींत त्यांनी मी कबीर आहे असें सांगितलें. त्यांना रामजन्मोत्सवाची मोठी हौस होती. एका उत्सवांत शिर्डीस त्यावेळीं आतांसारखे गोदावरीचे पाट आलेले नव्हते. तेव्हां विहिरीला पाणी अगदीं थोडें होतें. उत्सवाचे कार्यकर्त्यां मंडळीला उत्सव कसा पार पडेल अशी चिंता उत्पन्न झाली असतां श्रीसाई महाराजांनीं एके ठिकाणीं खोदण्यास सांगितलें. व कमरेइतका खड्डा होतो न होतों तोंच त्याला पाणी लागलें. उत्सवांत पाण्याची वाण पडली नाहीं व पौर्णिमा झाल्यावर त्या खड्यांत पाणीहि राहिलें नाहीं. म्हणून कमेटीच्या लोकांनीं महाराजांनीं घेतलेल्या मूर्तींच्या स्थापनेचें कार्य आधीं हातांत घ्यावें असे मला वाटतें. हल्ली जी नवलकर यांची जागा संस्थानकडे आली आहे त्या जागेंत रामाच्या मूर्तींची स्थापना झाल्यास रामकृष्ण नवलकरांचेहि रामाच्या स्थापनेनें राम हे नाव कायम राहील. एकंदर सर्व बाजूचा विचार करतां कमेटीनें राममूर्ती स्थापनेचें कार्य आधीं हातांत घ्यावें, व एकजुटीनें तडीस न्यावें. इतक्या उपर कमेटी-च्या मर्जीस येईल तसे करण्यास कमेटी मुकत्यार आहे. मला जे वाटले ते कमेटीच्यापुढें मांडले आहे. कळावे.

दासगणू.

—:x:—

# जमाखर्चाचा तपशील

श्री सच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संत चूडामणी श्रीसाईबाबा महाराज संस्थान शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांच्या शके १८६२ च्या रामनवमीच्या उत्सवाच्या जमाखर्चाचें पत्रक.

**जमा**

१५७५-११-६

तपशील:—

६९१-१५-३ श्री. दासगणूंचें मार्फत

९८-०-६ पांच दिवसाचे पेटींतील

१५०-०-० श्री. तात्या पाटील मार्फत इगाम्याकरितां वसुली

५६१-१३-९ श्री. खारकर चिटणीसमार्फत

४९-४-० श्री. सामंत खजिनदारांमार्फत

२४-१०-० श्री. घैसास दु. ख. मार्फत

१५७५-११-६

**खर्च**

१५०६-५-९

तपशील:—

१११३-१४-६ श्री. दासगणूंचे मार्फत

२४८-०-६ श्री. तात्या पाटील मार्फत कुस्त्यांचे इगाम्याकडे

७९-१-० श्री. खारकर चि. मार्फत निमंत्रणाकडे वगैरे.

४९-१५-९ श्री. बाळागुरव मार्फत प्रसादाकडे.

१५-६-० श्री. घैसास मार्फत छपाई वगैरे

१५०६-५-९

६९-५-९ शिल्लक श्री. दासगणूकडे

नांववार उत्सव वसुलीची यादी सवडीप्रमाणें लीलेंत प्रसिद्ध करणेंत येईल.

श्री. ना. खारकर
ऑ. चि.

—:+:—

॥ श्रीसाईनाथप्रसन्न ॥

# श्रीसद्गुरु साईनाथ सेवा संस्था

भिवपुरीरोड, ता. कर्जत, जि. कुलाबा.

ता. २-६-१९४०

श्रीयुत रा. रा. श्री. ना. खारकर ऑ. चिटणीस "श्रीसाईबाबा शिरडीसंस्थान" यांसी सप्रेम नमस्कार वि. वि.

वरील संस्थेतर्फे सालाबादप्रमाणें श्रीरामनवमीचा उत्सव मिति चैत्र शुद्ध ९ मी १८६२ मंगळवार ता. १६ माहे एप्रिल १९४० रोजी उकुलगांवी श्रीसाईमंदिरांत करण्यांत आला, त्याबद्दलचा अहवाल आपणाकडे पाठवीत आहों. तो साईलीला मासिकांत आपण प्रसिद्ध कराल अशी उमेद आहे. संस्थेचे या विनंतीस मान्यता दिल्यास ही संस्था श्रीसाईबाबा शिरडी संस्थानची कायमची ऋणी राहील.

कळावे लोभ असावा हे विनंति.

आपले नम्र साईदास,

श्री रा. रा. भालचंद्र केशव कुळकर्णी.

श्री. रा. रा. वासुदेव गोपाळ देशपांडे.

संयुक्त ऑ. चिटणीस.

श्रीसद्गुरु साईनाथ सेवा संस्था—

भिवपुरीरोड, ता. कर्जत.

## 'चैत्र शुद्ध ९-रामनवमी-उत्सव-शके १८६२'

वरील संस्थेतर्फे उकुळ गांवी, स्टेशन भिवपुरीरोड (तालुका कर्जत) येथील श्रीसाईमंदिरांत साळाबादप्रमाणें रामनवमी उत्सव मोठ्या उत्साहानें साईभक्तांनी मंगळवार ता. १६-४-१९४० रोजीं साजरा केला.

संस्थेचे कांहीं सभासद व भक्तमंडळी मुंबईहून मुद्दाम उत्सवानिमित्त भिवपुरीरोड येथें आली होती. कांहीं मंडळी रविवार ता. १४–४–४० रोजीं अगोदर येऊन उत्सवाच्या प्राथमिक तयारीच्या मेहनतीला लागली होती. व कांहींमंडळी मंगळवारी ता. १६–४–१९४० रोजीं पहाटेस २–३० वाजण्याच्या सुमारास आली. त्याच्या-करिता स्टेशनवर गडी ठेवून त्यांना श्री साईमंदिरांत आणण्याची सोय मुद्दाम करण्यांत आली होती. इतर बाहेरगांवाहून येणारी मंडळी उत्सवाच्या दिवशीं ९–३० वाजेपर्यंत साईमंदिरांत येऊं शकली.

श्रीसाईमंदिर भिवपुरीरोड स्टेशनपासून ५–७ मिनिटाच्या अंतरावर असल्यामुळें स्टेशनवर उतरतांक्षणींच मंदिराच्या झेंड्याचें दर्शन घडते व साईभक्त झेंड्यास भक्ती-भावानें तेथूनच प्रणाम करून मंदिरापर्यंत येतात.

उत्सवाच्या कार्यक्रमास सकाळी ८ वाजतां सुरवात करण्यांत आली. प्रथमतः श्रीस रुद्राभिषेक व षोडमोपचार पूजा वगैरे होऊन हा प्राथमिक विधि ११ वाजण्याच्या सुमारास पुरा झाला. तदनंतर श्रीरामजन्माच्या किर्तनाख्यानास सुरवात होऊन स्टॉ. टा. १२–३९ वाजतां श्रीरामजन्मोत्सव झाला. व १–३० वाजेपर्यंत इतर कार्यक्रम आटोपून प्रसादास आलेल्या मंडळीस प्रसाद देण्यांत आला व भोजनादि प्रसादाचा कार्यक्रम ४–३० वाज-ण्याच्या सुमारास आटोपला. भोजन–प्रसादास एकंदर २०० मंडळी होती.

याचवेळी ३–३० वाजण्याच्या सुमारास श्री साईमंदिरांत भजनाचा कार्यक्रम चालूच होता. आमंत्रित भजनी मंडळीना व जमलेल्या सर्व भक्तमंडळीना चहावगैरे देऊन भजनाचा कार्यक्रम ६–३० वाजतां आटोपला व ८ वाजतां “ सद्गुरु म्हणजे काय ?” या विषयावर प्रवचन होऊन राहिलेले सर्व कार्यक्रम रात्रौ ११–३० वाजतां उरकण्यांत आले.

मुंबईहून जवळ जवळ ७५–१०० मंडळी आली होती. कांहीं मंडळी पुण्याहून व वसईहून आली होती. या सर्व भक्तगणांत संस्थेची ४०–५० होती. व इतर भक्तमंडळी नव्यानेच आली होती.

श्रीयुत विनायकराव चिमणराव गडकरी यांनी मुंबईहून मोठ्या इलेक्ट्रीक बॅटऱ्या आणून मंदिराला जी शोभा आणली व मंदिर रात्रीच्या समयी त्या प्रकाशाच्या झोतामुळें जे सुंदर दिसत होते त्याचे श्रेय श्री. गडकरी यांनाच आहे व संस्था त्यांच्या या सहकार्याबद्दल अत्यंत आभारी आहे.

भक्तांच्या या सहकार्यामुळें व भक्तिपूर्ण सेवेनें जे कार्यक्रम यशस्वीरीतीनें व उत्साहानें पार पडले त्या सर्वांचे वर्णन करणें अशक्य आहे. आणि या सर्व कार्यक्रमाच्या वेळीं श्रीबाबा जणूं प्रत्यक्ष स्वरुपांत हजरच आहेत असा भास होत असल्याचा जो अनुभव कित्येकांना आला असेल तो सांगणे अगदीं अवर्णनीय आहे. उत्सवास वसुली रु. १०१ झाली व खर्च रु. १०१ झाला.

ज्या साईभक्तांनीं संस्थेला ज्या उदार अंतःकरणानें या उत्सवकार्यास देणग्या दिल्या व सहकार्य केले त्यामुळेंच संस्थेला श्रीबाबाच्या मंदिरांत वरील कार्यक्रम यशस्वीतेनें करतां आले. संस्था त्याबद्दल सर्वांची ऋणी आहे. श्री. रा. रा. श्रीधर नारायण खारकर ऑ. सेक्रेटरी, श्रीबाबा शिरडी संस्थान, यांच्या मार्गदर्शकत्वाचा संस्थेला जो अमोलिक लाभ झाला आहे त्यामुळें व श्री. रा. रा. रामचंद्र वासुदेव घैसास, श्रीसाईलीला संपादक यांच्या सहकार्यतेनें संस्थेचे जें काम आम्ही हाती घेत आहो ते करण्यास संस्थेचे चालकांस बराचसा विश्वास वाटत आहे व हुरुप आला आहे.

श्री रामनवमीच्या उत्सवाच्या निमंत्रण पत्रिकेबरोबर श्रीसाईमंदिराच्या परिस्थितिविषयीं माहिती व मदती करितां याचना केली आहे. त्या प्रमाणें एकंदर रु. १२३/-मिळाले आहेत. मंदिराच्या जीर्णोद्धाराकरितां लागणाऱ्या खर्चाच्या मानानेंही ही रक्कम अगदीच अपुरी आहे. म्हणून सर्व साईभक्तांना या कामीं सढळ हातानें मदत करणेंविषयीं विनंती आहे.

श्री. रा. रा. श्रीधर नारायण खारकर ऑ. चि. व श्री. रा. रा. वसंतराव नारायण गोरक्षकर शिरडी संस्थानचे ट्रस्टी यांनी भिवपुरीरोड येथें येऊन मंदिरास भेट देऊन, प्रत्यक्ष परिस्थिती पाहून गेल्याबद्दल व आमच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

आपले नम्र साईदास,
भा. के. कुळकर्णी
वा. गो. देशपांडे
सं. ऑ. चिटणीस,

# शिरडीवृत्त

## जून १९४०.

या महिन्यांत मद्रास, चितळदुर्ग, त्रिचनापली, गंतूर, मुंबई, पुणें, न्यू दिल्ली, सिकंदराबाद [ दक्षिण ], बंगलोर, होसंगाबाद, नगर, नाशिक व ठाणें येथून बरीच भक्तमंडळी श्रीचे दर्शनास येऊन गेली.

एकंदर ७ आर्चनें व ५३ आभिषेक या महिन्यांत भक्तांकडून श्रीचे समाधीवर करविण्यांत आले.

संस्थान गवयाची एकादशीप्रित्यर्थ मंदिरांत दोन कीर्तनें झाली व मंदिराजवळील उत्तर बाजूचें पटांगणांत गावकरी लोकांचे दशावतारी [ आखाडी ] खेळ नऊ दिवस हौसेनें झाले व ते खेळ पाहणेचे निमित्तानें आजुबाजूचे खेड्यांतलि हजारो लोक श्रीचे दर्शन येऊन गेले.

संस्थानचे लोकप्रियट्रस्टी व बाबांचे जुने निःसीम भक्तवर्य रा. बा. सखाराम बळवंत उर्फ भाऊसाहेब धुमाळ वकील नाशिक, हे शनिवार ता. २९।६।४० रोजीं एकाएकी हार्टडिझीजनें श्रीसाईचरणी विलीन झालेमुळें येथील लोकांस फार दुःख वाटत आहे.

पावसाळा सुरू होऊन दरसालपेक्षां यंदा पाऊस जास्त पडत आहे. बाकी हवा उत्तम आहे.

श्री. ना. खारकर
ऑ. चि.

# शिरडीवृत्त

## जून १९४०.

या महिन्यांत मद्रास, चितळदुर्ग, त्रिचनापल्ली, गंतूर, मुंबई, पुणें, न्यू दिल्ली, सिकंदराबाद [ दक्षिण ], बंगलोर, होसंगाबाद, नगर, नाशिक व ठाणें येथून बरीच भक्तमंडळी श्रीचे दर्शनास येऊन गेली.

एकंदर ७ आर्चनें व ५३ आभिषेक या महिन्यांत भक्तांकडून श्रीचे समाधीवर करविंणत आले.

संस्थान गवयाची एकादशीप्रित्यर्थ मंदिरांत दोन कीर्तनें झाली व मंदिराजवळील उत्तर बाजूचें पटांगणांत गावकरी लोकांचे दशावतारी [ आखाडी ] खेळ नऊ दिवस हौसेनें झाले व ते खेळ पाहणेचे निमित्तानें आजुबाजूचे खेड्यांतलि हजारो लोक श्रीचे दर्शन येऊन गेले.

संस्थानचे लोकप्रियट्रस्टी व बाबांचे जुने निःसीम भक्तवर्य रा. बा. सखाराम बळवंत उर्फ भाऊसाहेब धुमाळ वकील नाशिक, हे शनिवार ता. २९।६।४० रोजीं एकाएकी हार्टडिझीजनें श्रीसाईचरणीं विलीन झालेमुळें येथील लोकांस फार दुःख वाटत आहे.

पावसाळा सुरू होऊन दरसालपेक्षां यंदा पाऊस जास्त पडत आहे. बाकी हवा उत्तम आहे.

श्री. ना. खारकर
ऑ. चि.

# अनुभव

## १ फकिराचे वेषांत बाबांचे दर्शन

ऑ. चि. खारकर कळवितात:—

रा. सा. बी. पी. चेटी, ५५ स्ट्राटेन मुथीया मुदाली स्ट्रीट, मद्रास कळवितात कीं श्रीसाईबाबानीं स्वप्नांत प्रत्यक्ष दर्शन गुडूर येथील एका गृहस्थांस देऊन तेथील एका विविशीत जागी आपले देऊळ बांधण्यास सांगितलें. ती जागा लाकुड-तोडीचा धंदा करणारे मजुर वर्गाचें राहणेंची होती व त्या लोकानां बाबांची माहिति नसल्यामुळें देवळाकरितां जागा देण्याचें त्यानीं नाकारलें. पुढें ते लाकुडतोडे एक दिवस जंगलांतून परत येत असतां दिवसाढवळ्या एक फकीर त्यांना भेटला व म्हणाला मला राहणेस जागा द्या.पुढें तो फकीर म्हणजे बाबा ही कल्पना त्या लोकांस नव्हती परंतु कांहीं दिवसांनीं देऊळ बांधणेस जागा मागणारे गृहस्थांची व त्या लोकांची पुन्हा भेट पडली असतां ते लोक साहजिक एक फकीर भेटून राहाणेस जागा मागत होता वगैरे हकीकत सांगू लागले तेव्हां त्या गृहस्थानें आपले जवळ असलेला बाबांचा फोटो त्या लोकांस दाखविला. तेव्हां आश्चर्याची गोष्ट कीं त्या सर्व लोकांस भेटलेला फकीर तो हाच अशी पूर्ण ओळख पटून त्यांनीं जागा देणेंची तावडतोब कबुली दिली व त्या जागीं बाबांचें ल्हानसें देऊळ बांधलें गेलें. हेंच देऊळ गेलें ता. १५ जुन १९४० शनिवार रोजीं श्रीयुत स्वामींचे हस्तें उघडलें जाऊन त्या देवळांत त्यांच्या हस्तें बाबांच्या छबीची स्थापना झाली आहे.

S. N. Kharkar.
ऑ. चि. श्री सा. शि. सं.

## २ आजारपणांत बाबांची कृपा

माझे मधले बंधु ल्हानपणापासून श्री बाबांचे उपासक. कांहीं कामानिमित्त घरा-बाहेर पडायाचे झालें कीं पहिलें काम बाबांचे फोटोला नमस्कार करून व उदी लावून मग बाहेर पडायचें. हा त्याचा क्रम आज कित्येक वर्षें चालू आहे. आम्हा भावापैकीं कोणालाहि शिरडीस बाबांच्या समाधीच्या दर्शनाचा सुयोग आला नाहीं. श्रीबाबांचे रामनवमी उत्सव, व्यासपूजा, व पुण्यतिथी उत्सवाकरतां सेक्रेटरी यांच्याकडे जाऊन वर्गणी भरणें, येताना उदीची पुडी घेऊन येणें व नंतर बाबांचा प्रसाद व उदी केव्हां हातीं पडेल याची चातक पक्षाप्रमाणें वाट पाहात राहावे यातच आनंद मानीत आज कित्येक वर्षे निघून गेली.

मधल्या बंधूच्यामुळें मी व माझे धाकटे बंधू पण त्यांचे अंध अनुकरण करूं लागलो. चार वर्षांपूर्वी माझे मधले बंधु मानेतील ५ व ६ वा कणा दुखवल्यामुळें आजारी झाले. त्यांच्या दोन्हीं पायांतील व हातांतील शक्ति गेली होती. माझे मामेभाऊ डॉ० प्रधान अंधेरीस असतात. त्यांना बोलावून आणले व काय योजना करावी म्हणून त्यांची सल्ला घेतली. आजार जोराचा आहे. हास्पीटलमध्यें ठेवल्याशिवाय नीट व्यवस्था होणार नाहीं. तरी कसेंही करून हास्पीटलमध्यें ठेवा. धाकट्या बंधुनें व डॉ० नें मधल्या बंधूस हास्पीटलमध्यें ठेवलें. ५ व ६ वा कणा दुखवला आहे. रोग लौकर बरा होणार नाहीं. आम्ही शक्यतों प्रयत्न करूं. त्याला दोन महिने प्लास्टरमध्यें ठेवलें होतें. जेवणखाण वगैरे सर्व विधी नर्सेस करीत. हातापायाची क्रिया पार गेली होती. पण विचार शक्ति मात्र कायम होती. औषधोपचार व त्याचा बाबांचा जप मात्र चालू होता. त्याच वेळेस माझ्या बंधुच्या शेजारी एक वऱ्हाड मधील डॉक्टर कांहीं दिवस औषध घेण्याकरतां आले होते. हे डॉक्टर बाबांचे भक्त होते. हे डॉक्टर बंधुच्या समाचाराला नेहमीं जात व म्हणत असत कीं तुम्हीं बाबांचे उपासक आहांत. या रोगातून तुम्ही खास बरे व्हाल जप चालू असूं द्या. त्याच सुमारास बंधुच्या मानेवर आपरेशन करावे असे कांहीं डॉक्टरचे मत होते. परंतु बाबांच्या कृपेनें आपरेशन न होता त्याला बरे वाटूं लागले. १३ महिन्यानंतर थोडी बसण्याची परवानगीं दिली. नंतर दोन महिन्यानीं जरा चालतां येऊं लागल्यावर घरी जाण्याची परवानगी दिली. एकंदर बंधूनें १८ महिने हॉस्पिटलमध्यें काढले. श्रीबाबांच्या कृपेनें जे जे डॉक्टर त्याला तपासण्यास येत ते ते फार प्रेमानें वागवीत. हॉस्पीटलचा कायदा रोगी ३ महिन्याचा वर ठेवावयाचा नांहीं. परंतु बाबाच्या कृपेनें १८ महिने त्याला राहण्यास मिळाले. ज्या गोष्टी पैसे खर्चून होत नाहींत त्या बाबांच्या कृपेनें सहज होऊं शकतात. १८ महिन्यापूर्वी माझ्या बंधूला उचलून हॉस्पिटलध्ये न्यावे लागले. तो माझा मधला भाऊ चालत ऑपरेशन न होता घरी आला. आतां त्यांची प्रकृति उत्तम असून खारपासून वांद्र्यापर्यंत तो एकटा जाऊं शकतो. श्री बाबाच्या कृपेनें काय होणार नाही. श्रद्धा पाहिजे.

एक भक्त

गोविंद शिवराम कारखानीस

मारवाड्याची चाळ, वांद्रे

# श्रीसाईनाथ महाराजांच्या आख्यायिका

समर्थ बाबांच्या भक्तांत मुक्ताराम या नवाचे एक भक्त असत. ते बाबांच्या प्रमाणेंच पोषाख करीत असत. म्हणजे डोक्यास एक फडकें, अंगांत कफनी व कमरेस लंगोटी इतकेच कपडे ते निरंतर वापरीत असत. त्यांची बैठकही मशिदींत बाबांच्या समोर धुणीजवळ असें. रामासमोर जसा भक्त मारुती अगर कृष्णासमोर जसा भक्त गरुड त्याचप्रमाणें समर्थ साईनाथ महाराजांच्या समोर त्यांचे भक्त मुक्ताराम लोकांस दिसत असत. हे आपला सर्वकाळ समर्थांच्या सान्निध्यांत घालवीत. शिरडीस जाणाऱ्या भक्तांनीं यांना पाहिलें असलेंच पाहिजे. राहणी, वागणी, पोषाख, बोलणें, हातवारे वगैरे सर्व गोष्टींत हे बाबांचे अनुकरण समर्थ बाबांचे हयातींत करीत असत. परगांवचे भक्तांस शिरडीस गेल्यावर असें वाटत असे कीं, मुक्ताराम यांची समर्थ बाबावर अतिशय भक्ति आहे. असो.

हे मुक्ताराम नुकतेच स्वर्गवासी झालें. त्यांच्या मृत्यूची हकीकत किंचित् चमत्कारिक असल्यामुळें ती सर्वांस कळवावी असें आम्हांस वाटतें.

समर्थ बाबा समाधिस्थ झाल्यावर मुक्ताराम यांस वाटावयास लागलें कीं, आपण आतां समर्थ बाबांच्या ठिकाणीं आहों. पोषाख, बोलणें, वागणें यांत बाबांचें अनुकरण चांगलेंच साधलें आहे, मग बाबांच्या गादीचे आपण मालक व्हावयास काय हरकत आहे असें त्यांस वाटूं लागलें. नंतर हळू हळू त्यांचे वर्तनांत फरक दिसूं लागला. एके दिवशीं मुक्ताराम हे, समर्थ बाबा ज्या कठड्यापाशीं गादीवर बसत असत, त्या ठिकाणीं गादीवर बसले व समर्थ कठड्यावर जसा हात टाकीत असत त्याप्रमाणें कठड्यावर हात टाकूं लागले. समर्थ बाबांच्या कांहीं वजनदार भक्तांचे नजरेस ही गोष्ट आली, तेव्हां त्यांनीं त्याचा धिःकारयुक्त शब्दांनीं निषेध केला, व पुष्कळ उपदेशही केला. परन्तु मुक्ताराम यास समर्थबाबांची गादी बळकवावयाची असल्यामुळें भक्त मंडळीनें दाखविलेल्या अनादरास त्यांनीं जुमानलें नाहीं. भक्तमंडळींत हें मुक्तारामाचें आचरण लवकर विकोपास जाणार होतें. परन्तु समर्थ बाबांनीं थोडक्यांत मुक्ताराम यास अनुभव दाखविला. समर्थांचे गादीस पाय लावल्यानंतर थोडक्याच आवकाशांत मुक्ताराम यांचे पोटात कळ निघाली व पोट दुखूं लागलें. पुढें कितीही उपचार केले तरी पोट दुखणें राहीना. मुक्ताराम

यानेंहि समर्थ बाबांच्या समाधीपुढें पुष्कळ प्रार्थना केली, तरी कांही उपयोग न होता दोन दिवसांचे आंत त्या पोटफुगीनें मुक्तारास यांचा अन्त झाला; केलेल्या अपराधाबद्दल मुक्ताराम यास योग्य शासन झालें असें समर्थ बाबांचे पुष्कळ भक्तांस त्यावेळी वाटलें, व अद्यापही वाटत आहे.

समर्थ बाबा ह्यात असतानाही ज्यांनीं बाबांचा अपमान जाणून संवरून केला त्या सर्वांसही अशाच प्रकारचे ठेकताळे आले असल्याचें सांगतात, व कांहींचे अनुभव तर आम्हांस प्रत्यक्ष माहीतच आहेत, ते यथावकाश प्रभेंत छापलें जातीलच. मुक्ताराम हे जानेवारींत स्वर्गवासी झाले.

" सा. प्र. " एप्रिल १९१९

रा. रा. संपादक श्रीसाईनाथप्रभा पुणें यांसीः—

कृ. सा. न. वि. वि. श्रीसाईनाथप्रभेच्या दुसऱ्या वर्षाच्या चौथ्या किरणांतील ८ वा लेख—"श्रीसाईनाथमहाराजांच्या आख्यायिका" वाचून विचार सुचले ते आपणास कळवावें, असें वाटल्यावरून हें पत्र लिहित आहे.

यांतील मुक्ताराम नांवाच्या भक्ताच्या मृत्यूची हकीगत बरोबर नाहीं. मुक्ताराम हे मूळचे रावेरकडचे राहणारे. तेथें त्यांचें घरदार, शेतीवाडी, मातोश्री, कुटुंब वगैरे मंडळी आहेत. " मुक्ताराम " नांवही त्यांना श्रीसमर्थांनींच दिलें होतें. सुमारें ७।८ वर्षांपूर्वी मुक्ताराम शिरडीस श्रीसमर्थांचे दर्शनाला आले. व कांहीं कालानें उपरति होऊन त्यांनीं सर्वसंगपरित्याग करून आपण वर्णन केलेला वेष घेतला. नंतर कांहीं वर्षे ते शिरडीस जाऊन येऊन असत. सुमारें तीन वर्षांपूर्वी ते शिरडीस परत आले व तेव्हांपासून त्यांनीं शिरडीसच कायमची वस्ती केली. त्यांचा नित्यक्रम म्हणजे सकाळपासून दुपारची आरती होईपर्यंत श्रीसमर्थांच्या सन्निध्यांत धुनीजवळ बसून राहणें न्याहारी व जेवण श्रीसमर्थांनीं नेमून दिलेल्या रा. रा. दीक्षितांच्या वाड्यांतील एका अगदीं लहान पत्राच्या खोलींत धुनी जळत ठेवून तिच्या शेजारीं श्रीसमर्थांच्या सांगीप्रमाणें आपला काळ काढणें असा होता. ऐन उन्हाळ्यांतसुद्धां भर दोन प्रहरीं त्या लहानशा पत्र्याच्या बंद खोलींत पेटलेल्या धुनीजवळ ते बसून असत, व ही त्यांची तपश्चर्या बरी

कठीणपैकी होती, असा पुष्कळांचा समज असे. व त्यांच्याबद्दल एक प्रकारचा आदरही मनांत असे. कफनी व फडके हीं अलिकडे त्यांना श्रीसमर्थांकडूनच मिळत असत.

समर्थांचा काल झाला त्यापूर्वी सुमारें तीन महिन्यांपासून मुक्ताराम आजारी होतें. त्यांना ताप व खोकल्याचा विकार जडला होता. आजारी पडल्यापासून बहुतेक ते आपल्या खोलींतच पडून असत. श्रीसमर्थांचा काल झाला त्यावेळीं मुक्तारामाची प्रकृति बरीच बिघडलेली होती व त्यांचें दुखणें क्षयावर गेल्याची स्पष्टचिन्हें दिसत होती. व ते बहुतेक आपले खोलींतच पडून असत. "समर्थांनीं समाधि घेतल्यावर सुमारें ८।९ दिवसांनीं एके दिवशीं मुक्ताराम हे समर्थांच्या मशिदीत गेले व २४ तासांच्या आंतच आपलें खोलींत परत आले." मशिदीत असतांना "समर्थबाबा ज्या कठड्यापाशी गादीवर बसत असत त्या ठिकाणीं गादीवर" ते बसले नाहीत व समर्थ कठड्यावर जसे हात टाकीत असत त्याप्रमाणें कठड्यावर त्यांनीं हात टाकला नाहीं. मुक्ताराम मधल्या एका खांबाजवळ आपल्या पोत्यावर बसून होतें. मुक्तारामांचा मशिदींत बसण्याचा विचार आहे असें कांहीं मंडळीस त्यावेळीं वाटलें व त्यांपैकीं प्रस्तुत लेखकही एक होता. परंतु लौकरच ते आपल्या खोलींत परत गेल्यामुळें सर्वच शंका दूर झाली. खोलींत परत आल्यानंतर लेखकानें त्यांना मशिदीत गेलांत कां व परत आलात कां हे प्रश्न विचारलें. तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं प्रकृति बिघडल्यामुळें त्रासून गेलों आहे व मशिदीत बसून समर्थांची प्रार्थना केल्यास आराम वाटेल म्हणून तेथें गेलों. परन्तु बसवत नसल्यामुळें तेथें पडून रहाणें, खोकल्यानंतर थुंकणें वगैरे प्रशस्त न वाटल्यामुळें परत खोलींत येऊन पडलों. हा प्रकार झाला आक्टोबर महिन्यांत. पुढें त्यांची प्रकृति दिवसेंदिवस खालवत जाऊन २-२॥ महिन्यांनीं क्षयरोगानें त्यांचा अन्त जानेवारी महिन्यांत झाला.

आपल्या लेखावरून श्रीसमर्थ ही एक निष्ठुर मूर्ति होती असा समज होण्यासारखा आहे, परन्तु प्रस्तुत लेखकांचा व दुसऱ्या पुष्कळ भक्तांचा अनुभव असा आहे कीं, श्रीसमर्थ हे प्रत्यक्ष दयेचा व क्षमेचा अवतार होतें. भक्तमंडळींना ते आपल्या लेंकरांप्रमाणें संभाळीत असत. अपराध करणाऱ्यांस पश्चात्ताप होऊन क्षमा मागितल्यावर पूर्ण क्षमा मिळत असे. अपराध्याला शिक्षा झाल्यास सौम्य प्रकारची असे. कळावें. लो. अ. ही. वि.

आपला
मित्र

* मुक्तारामाच्या मृत्यूची हकीगत मागील अंकीं जी आम्हीं लिहिली, ती समर्थ साईनाथ बाबांच्या एका श्रेष्ठ भक्ताकडूनच खुद्द शिरडींहून लिहून आली होती. आम्ही केवळ निमित्तमात्र अहोंत. असो. आम्हांस मुक्तारामाची पूर्वीची हकीगत माहीत नव्हती. आमचे मित्रांनीं त्यांस माहित असलेली ज्यास्त हकीगत लिहून कळविली, त्याबद्दल आम्ही आमच्या ' मित्रा'चे आभारी आहोंत.

" सा. प्र. " मे १९११

संपादक

* * * *

वरील उतारा भक्तवृंदांचे माहिती करितां देणेंत उद्देश कीं हल्ली शिरडींत येणारे नवीन भक्तांस ज्या जुन्या हकीगती तोंडी ऐकिवांत येतात त्यांचे विश्वसनीयतेच-बद्दल कोणता धारवाडी काटा लावणें जरूर आहे याची जाणीव व्हावी.

लीला संपादक

# List of books about Shri Sai Baba.

——:o:——

Madras books available at Sai Samsthan, Shirdi, P. O. Dist Ahmednagar Rahata and with:—

Rao Saheb B. Papaiya Chetty, 55, Stroten Muthia Mudail Street, Madras.

| | |
|---|---|
| Introduction to Shri Sai Baba by B. V. N. Swami | |
| English, Malayalam, Tamil, Telugu, Canarese & Urdu | 0–2–0 |
| Experiences of Devotees of Shri Sai Baba by | |
| B. V. N. Swami (English) part 1 ... | 0–4–0 |
| " " " " 2 ... | 0–4–0 |
| " " (in Tamil) Part 1 ... | 0–4–0 |
| Madras Devotee's Experiences (English) ... ... | 0–3–0 |
| The above three English books bound in half calico ... | 0–12–0 |
| " " " " in wrapper ... | 0–10–0 |
| Namawali (i. e- 108 names of Sai Baba) In Sanskrit, | |
| Telugu, Tamil, Malayalam, Canarese. each ... ... | 0–0–6 |
| Sai Leela (in Telugu) by Rao Saheb B. Papaiya Chettiar. | 0–8–0 |
| Sai Stava („) by Satavadani Doma Venkatswamy Gupta. | 0–2–0 |
| Sai Sadgeeta (Tamil) songs set to music by Sow. S. Rajam | 0–1–0 |
| Sai Sangita Kirtan („) by Sow Amritam ... ... | 0–1–0 |
| Sai Pooja Vidhi in Tamil for Sanskrit ... ... | 0–1–0 |
| Sai Manasa Pooja (Sanskrit) ... ... ... .. | 0–1–0 |

For Gujrathi:—

"Guru Smriti," ' Manache Shloka" & "Hari Path" write to Mr. Wamanrao Prangovind Patel, Head master, Society School, Umreth Dist. Kaira.

For Coloured pictures of Sai Baba:—

write to Mr. D. V. Sambare, Tejpal Road, Vile-Parle and to Rao Saheb B. P. Chetty, 55 Strothen Muthi Mudali Street, Madas.

For lockets of Baba:—

Write to 1 A. S Gopalakrishnan, West Boulevard Road Trichinopoly

2 R. Vanchinatha Iyer, 30 Neeli Veeraswami Chetty St., Triplicane, Madras.

**For Authentic Photos of Sai Baba:—**

write to Mr. R. V. Ghaisas, Editor Sailila, Dadar. ( sizes avaible, card, cabinet, little bigger locket and bigger, enlargement. )

**For Guide to Shirdi in English:—**

As. 2

write to the clerk, Shirdi Sansthan, at Shirdi. Post Rahata Dist. Ahmednagar

All correspondence regarding Shri Sai Leela should be addlessed to–Editor Sai Lila, GokhaleRoad (North), Dadar, Bombay 14

छातीचे विकारांवर
सांडू ब्रदर्स यांचें
हार्टिना
Regd.
(HEARTINA)

HEARTINA
Excellent Heart Tonic

छातींत कळा येणें, सुई टोंचल्या सारखं वाटणें, छातींत घबराट होणें, फुप्फुस विकार, High Blood Pressure इत्यादि विकारांवर रामबाण.

बा. किं. रु. ३ (ट. ख. नि.)
सविस्तर माहिती साठीं लिहा:—
द. कृ. सांडू ब्रदर्स,
आर्यौषधि कारखाना.
चेंबूर–मुंबई.

सूचना:—कोणास जाहिराती देणें असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. रामचंद्र वासुदेव घैसास लो.टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २, गोखलेरोड नार्थ, दादर

Printed at Calendar Press, Dadar and Published by R.V. Ghaisas–Lokmanya Tilak Jubilee Trust Bldg. No.2, Gokhale Rd. North Dadar, Bombay 14.